**कृपया प्रसिध्दीसाठी** **14 एप्रिल 2009**

## प्रचाराला आलेल्या राम नाईक यांचे कुष्ठपीडितांच्या वस्तीमध्ये जोरदार स्वागत

**मुंबई, मंगळवार :** संजय नगर या बोरीवलीतील कुष्ठपीडितांच्या वस्तीमध्ये काल सायंकाळी जणू लगीनसराईची गडबड होती. कारण ही तसंच होतं. वर्षानुवर्षे या उपेक्षित कुष्ठपीडितांच्या मदतीला धावून जाणारे श्री. राम नाईक हे उत्तर मुंबई लोकसभा क्षेत्राचे भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार म्हणून मतं मागायला येणार हे कळल्यामुळे लगबग होती. प्रत्यक्षात श्री. राम नाईक यांचा 'परिवर्तन रथ' संजय नगरला पोहोचल्यावर आबाल वृध्दांनी एकच गर्दी करुन त्यांचं जोरदार स्वागत केलं. "आमच्यासारख्या उपेक्षितांसाठी तुम्ही जे काम करता ते वाया जाणार नाही. आमच्या वतीने तुम्ही राज्यसभेत सादर केलेल्या याचिकेनुसार कायदा बनवायचं कामही तुम्हीच केंद्रिय मंत्री म्हणून कराल," अशी ग्वाही उपस्थित कुष्ठपीडितांनी श्री. राम नाईक यांना दिली.

दहिसर विधानसभा क्षेत्रातील बोरीवली व दहिसर पूर्व भागात काल सायंकाळी श्री. राम नाईक यांची प्रचारफेरी होती. यावेळी त्यांच्यासोबत भाजपा-मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी, शिवसेना विभाग प्रमुख श्री. विनोद घोसाळकर व माजी उपमहापौर श्री. रमेश मेढेकर हेही होते. श्री. नाईक यांच्या प्रचार फेरीची सुरुवात सुकरवाडीतून झाली. अधिकतर रेल्वे हमालांची व बुटपॉलिशवाल्यांची घरे असलेल्या या वस्तीत श्री. राम नाईक यांनी आमदार असताना देशातले पहिले दुमजली शौचालय उभारले होते. तिथपासून या परिसरातील रहिवाश्यांनी नेहमीच त्यांना आपला पाठींबा दिला आहे. त्यामुळे कालही इथे श्री. राम नाईक यांचे स्वागत होणे स्वाभाविकच होते. त्यानंतर संजय नगर व पुढे दौलत नगर, प्रेमजी नगर, रतन नगर, दीप नारायण दुबे रस्ता, आंबेवाडी, मानव कल्याण केंद्र या भागात श्री. राम नाईक यांनी प्रचार केला. सर्वत्र श्री. नाईक यांना नागरिकांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत होता.

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्धी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**